स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने गुरूवार दि.२७ एप्रिल रोजी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

विद्यापीठाशी सलंग्नित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य, संचालक, अभ्यास मंडळांचे अध्यक्ष, नोंदणीकृत पदवीधर, अधिसभा सदस्य यांच्यासाठी ही कार्यशाळा होणार असून दिवसभराच्या या कार्यशाळेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या राज्य सुकाणू समितीचे अध्यक्ष तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. नितीन करमळकर, सुकाणू समितीचे सदस्य व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, सेवानिवृत्त प्राचार्य अनिल राव, मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू प्रा. आर. डी. कुलकर्णी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा. दीपक दलाल हे मार्गदर्शन करणार आहेत.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अंमलबजावणीसाठी सुकाणू समितीने श्रेयांक आणि अभ्यासक्रम आराखडा निश्चित केला होता गेल्या आठवड्यात राज्यसरकारने या आराखड्याला मंजूरी दिली असून येत्या नवीन शैक्षणिक वर्षापासून त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. त्या दृष्टीकोनातून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आणि परीक्षा या विषयावर दिवसभराच्या या कार्यशाळेत मंथन होणार आहे. विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात ही कार्यशाळा होणार आहे.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. २४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने "शेतकरी सहायता उपक्रम" राबविण्यात येणार असून शेतक-यांना या उपक्रमांतर्गत मार्गदर्शन केले जाणार आहे. हा उपक्रम राबविण्यासाठी संलग्नित सर्व महाविद्यालयांकडून तसेच शेतकरी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून शेतकरी सहायता उपक्रम राबविण्यात येणार आहे. खान्देशातील बहूतांश जनजीवन हे शेतीशी निगडीत आहे तसेच इथले सांस्कृतिक जीवन शेती-मातीशी जोडलेले आहे. कृषीसंस्कृतीनिष्ठ प्रदेशातील तरूण पिढीच्या उज्वल भवितव्यासाठी विद्यापीठ कटीबध्द आहे मात्र त्यासोबतच मुलांना उच्च शिक्षणात आणण्यासाठी कष्ट उपासणा-या त्यांच्या शेतकरी आई-वडीलांच्या जीवन विकासासाठी देखील विद्यापीठाने या उपक्रमामार्फत पाऊल टाकले आहे. या उपक्रमांतर्गत शेतक-यांसाठी तंत्रज्ञान साक्षरता कार्यशाळा, विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन, शेतीशी निगडीत व शेतीपूरक उद्योग व्यवसायाबाबत मार्गदर्शन व प्रशिक्षण शेतक-यांसाठी पारंपारिक ज्ञानाचे जतन व हस्तांतरण संवर्धन कार्यशाळा आणि शेतकरी कुटूंबासाठी समुपदेशन कार्यशाळा आदी कार्यक्रम आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत राबविले जाणार आहेत. हे उपक्रम राबविण्यास इच्छूक असणा-या महाविद्यालयांनी तसेच शेतक-यांच्या विविध सहकारी संस्था, सोसायट्या, संघ, कृषि उत्पन्न बाजार समित्या आदींनी आपले प्रस्ताव या विभागाकडे पाठवावेत. त्यासाठी प्रस्तावाचा विहीत नमुना पाठविण्यात आला आहे. प्राप्त प्रस्तावाना यथोचित मान्यता घेवून कार्यक्रमांचे आयोजन करण्यास परवानगी दिली जाईल. अशी माहिती या विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी दिली. या संदर्भात इच्छुकांनी ०२५७-२२५७४१५/४१६ या क्रमांकावर संपर्क साधावा.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ — दिनांक: २४ एप्रिल, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी